# ख्रिस्ताने पुढे काय होणार ते योहानाला दाखविले.

मुलांना शिकविणाऱ्यांनी R4b हा अभ्यास वाचावा.

## 1. प्रकटीकरणाचे पुस्तक शिकविण्यासाठी प्रार्थनापूर्वक वचनातून तयारी करा.

**प्रार्थना:** ''प्रिय येशू, तू सर्व पृथ्वीचा प्रभू आहेस. कोणतीही किंमत मोजावी लागली तरी तुझी सेवा करण्यास आणि तुझ्या येण्याकडे आशीर्वादित आशा म्हणून पाहण्यास विश्वासणाऱ्यांना व मला साहाय्य कर''

**टीप:** प्रकटीकरणाच्या पुस्तकात अनेक प्रतिक चिन्हे आहेत. बहुतेक प्रतिक चिन्हे ही जुन्या करारातील आहेत. ख्रिस्ताने जुन्या करारातील भविष्य संदेश कसे परिपूर्ण केले ते नवा करार दाखवितो. दु:ख सोसणाऱ्या ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्त परत पृथ्वीवर येईपर्यंत त्याच्याशी विश्वासू राहणे अगत्याचे असल्याचे प्रकटीकरणाचे पुस्तक शिकविते.



या आठवड्यात प्रकटीकरणाचे पुस्तक संपूर्ण वाचून काढा. त्यासाठी पुढील तक्ता कोष्टक वापरा. हे पुस्तक स्वर्गात डोकावण्यास आणि पृथ्वीवर जीवन जगण्यास कसे साहाय्य करते ते पाहा.

### पहिला दिवस

स्वर्गातील ख्रिस्ताविषयी पुढील संदेशामध्ये पाहा:

1:1-9 ख्रिस्ताने पृथ्वीवर आमच्यासाठी काय केले.

1:10-19 ख्रिस्त स्वर्गात आमच्यासाठी काय करतो.

2:1-3:22 ख्रिस्त पृथ्वीवरील विश्वासणाऱ्यांना काय सांगतो. (7 मंडळ्या)

4:1-5:14 ख्रिस्त स्वर्गातील विश्वासणाऱ्यांना काय सांगतो.

### दुसरा दिवस

ख्रिस्तासाठी जीवन जगण्याविषयी पुढील संदेशामध्ये पाहा:

6:1-17 स्वर्गात ठरविले जाते तसे पृथ्वीवर घडते (7 शिक्के)

7:1-8 विश्वासणारे ख्रिस्तासाठी पृथ्वीवर काय करतात (12 वंश)

7:9-8:6 ख्रिस्त विश्वासणाऱ्यांसाठी स्वर्गात काय करतो.

### तिसरा दिवस

देवाकडून होणारा न्याय याविषयी पुढील संदेशांमध्ये पाहा:

8:7-9:21 पृथ्वीवर घडणाऱ्या महाभयंकर गोष्टी (7 कर्णे)

10:1-11:2 स्वर्गात घडणाऱ्या अद्‌भुत गोष्टी (7 मेघगर्जना)

11:3-14 दुष्ट लोक पृथ्वीवरील विश्वासू विश्वासणाऱ्यांना काय करतील (2 साक्षीदार)

11:15-19 स्वर्ग दुष्ट लोकांचे काय करणार आहे.

## चौथा दिवस

आध्यात्मिक संघर्ष याविषयी पुढील संदेशांमध्ये पाहा:

12:1-12 चांगले आणि वाईट यांच्यातील स्वर्गामधील संघर्ष

12:13-17 चांगले आणि वाईट यांच्यातील पृथ्वीवरील संघर्ष

13:1-10 पृथ्वीवर विश्वासणाऱ्यांच्या विरोधात राजकिय सामर्थ्य (2श्वापदे)

13:11-18 पृथ्वीवरील विश्वासणाऱ्यांच्या विरोधात आध्यात्मिक सामर्थ्य.

## पाचवा दिवस

ख्रिस्ती लोक ह्या नात्याने सोसाव्या लागणाऱ्या दु:खाविषयी पुढील संदेशांमध्ये पाहा:

14:1-5 दु:ख सोसणारे विश्वासणारे स्वर्गात येतात.

14:6-12 स्वर्गातून पृथ्वीवर येणारे सामर्थ्यशाली देवदूत

14:13-18 देव स्वर्गात काय ठरवतो.

14:19-20 देव पृथ्वीवर काय करतो. (7 देवदूत)

## पाचवा दिवस ( पुढे सुरू )

ख्रिस्ताच्या परत येण्याविषयी पुढील संदेशांमध्ये पाहा:

15:1-8 देव स्वर्गात न्यायनिवाड्याविषयी कसा निर्णय घेईल.

16:1-21 देव जगाचा न्यायनिवाडा कसा करणार आहे.

17:1-18:3 बलशाली राष्ट्रांचे पृथ्वीवर अध:पतन कसे होणार (सात राजे)

18:4-8 देव मोठ्या नगरीला स्वर्गातून कसा दोष लावील.

18:9-24 देवाच्या इच्छेने पृथ्वीवर शेवटची शिक्षा कशा प्रकारे केली जाईल.

19:1-10 देवाच्या इच्छेने स्वर्गातून शेवटचा विजय कसा येणार आहे.

## सहावा दिवस

ख्रिस्ताच्या सार्वकालिक राज्याविषयी पुढील संदेशात पाहा:

19:11-18 ख्रिस्त स्वर्गात राजा म्हणून कसे राज्य करील.

19:19-21 ख्रिस्त पृथ्वीवर कसा विजयशाली होईल.

20:1-3 स्वर्गातील शक्ती सैतानाला कशा प्रकारे बांधून ठेवील.

20:4-10 ख्रिस्त सामर्थ्याने पृथ्वीवर कसे राज्य करणार आहे. (पहिले पुनरूत्थान)

20:11-17 देव सर्व दुष्टांचा स्वर्गातून कसा न्यायनिवाडा करणार आहे (दुसरे मरण)

21:1-8 देव पृथ्वीवरील सर्व नीतिमानांना कसे प्रतिफळ देणार आहे.


## सातवा दिवस

आजच्या लोकांसाठीचे संदेश पाहा:

21:9-27 विश्वासणाऱ्यांसाठीची स्वर्गीय अभिवचने.

22:1-5 पृथ्वीवरील दुष्टांसाठीचे इशारे.

### प्रकटीकरणाच्या पुस्तकातील महत्वाच्या घटना




**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रम ठरवा.**

दु:ख सोसणारे किंवा मोहाला बळी पडलेल्या विश्वासणाऱ्यांच्या भेटी घेऊन पुढील पुन्हा खात्री पटविणारी सात भविष्ये त्यांना वाचून दाखवा प्रकटी 2:10; 3:10; 7:14; 13:10; 14:12; 20:4 आणि 21:7

स्पष्ट करा ख्रिस्ती लोकांना नेहमीच समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे; परंतु, आम्ही ख्रिस्ताशी विश्वासू राहिलो तर तो आम्हाला प्रतिफळ देणार आहे.

तुम्ही नवीन पुढाऱ्यांना प्रशिक्षण देत असाल तर प्रकटीकरणाच्या पुस्तकाच्या अर्थाचे विवरण करण्यासाठी पुढील मार्गदर्शक सूचना त्यांना स्पष्ट करून सांगा.

- जुन्या करारातील प्रतिकांचा अर्थ शोधा.
- पवित्र शास्त्राच्या इतर भागांमध्ये शिकविलेले अर्थ फक्त प्रकटीकरणातील प्रतिकांना लावा.
- या पुस्तकात चिन्हे आणि प्रतिके दिली आहेत त्यावरून देवाचे संपूर्ण जगावर अगदी आपण ख्रिस्तासाठी दु:ख सहन करतानाही, पूर्ण नियंत्रण असल्याचे आपल्याला समजते.
- या पुस्तकातील प्रत्येक भाग ख्रिस्ती लोकांना ख्रिस्ताचे आज्ञापालन करून स्वर्गाची आशा धरण्यास कसे साहाय्य करतो ते पाहा.
- पुस्तक स्वत: शिकवीत असलेल्या गोष्टी नेहमी ख्रिस्ती लोकांना लागू करा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासना सभेसाठी योजना आखा.**

प्रकटीकरणाच्या पुस्तकातून एक अध्याय वाचा (अध्याय 7) किंवा दुसऱ्या कोणाला तरी सर्वांसाठी वाचायला सांगा.

पुस्तकाच्या अर्थाचे विवरण कसे करायचे ते सांगा आणि हे पुस्तक विश्वासणाऱ्यांना कसे लागू आहे याबद्दल त्यांना चर्चा करू द्या.

मुलांनी तयारी केलेले कार्यक्रम सादर करण्यास त्यांना संधी द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी प्रकटी 1:17 व 18 वाचा आणि येशूचे मरण व पुनरूत्थान आम्हाला आता आणि सदासर्वकाळचे जीवन पुरविते तसेच एकत्रित भाकरी मोडण्याने ह्या सत्य गोष्टींची आठवण करण्यास मदत होते हे स्पष्ट फोड करून सांगा.

तीन किंवा चार जणांचे लहान गट करा आणि एकमेकांच्या गरजा जाणून घ्या, त्यांना विश्वासू राहण्यास प्रोत्साहन द्या तसेच एकमेकांकरिता प्रार्थना करा.

**पाठ करा** प्रकटी 19:10

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net